**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक १६ सप्टेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **विकसित आणि सुरक्षित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी युवा पिढीला अंमली पदार्थांच्या विळख्यापासून वाचवणं अतिशय गरजेचं असल्याचं केंद्रीय गृहमंत्र्यांचं प्रतिपादन.**
2. **भंडारा ते गडचिरोली दरम्यान ९४ किलोमीटरचा द्रुतगती महामार्ग उभारण्यात येणार. प्रकल्पाच्या आखणीस आणि भूसंपादनास मंत्रिमंडळाची मान्यता.**
3. **नागपूरच्या कोराडी क्षेत्रात पर्यावरण पर्यटन प्रकल्प राबविण्यासाठी, मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत महाजनको आणि एनएमआरडीएमध्ये सामंजस्य करार.**
4. **संयुक्त किसान मोर्चाची शेतकरी न्याय हक्क परिषद उद्या वर्धा इथं होणार.**

**केंद्रीय गृहमंत्री अमित शहा**

२०४७ पर्यंत विकसित आणि सुरक्षित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी आपल्या युवा पिढीला अंमली पदार्थांच्या विळख्यापासून वाचवणं अतिशय गरजेचं आहे, असं प्रतिपादन गृहमंत्री अमित शहा यांनी आज केलं. राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या अंमली पदार्थविरोधी कृतिदल प्रमुखांच्या दुसऱ्या राष्ट्रीय परिषदेत ते आज नवी दिल्ली इथं बोलत होते. अंमली पदार्थांविरोधात व्यापक मोहीम उघडण्याचं आवाहन त्यांनी केलं. फक्त अंमली पदार्थविरोधी ब्युरो आणि गृहमंत्रालय नाही, तर याच्याशी संबंधित केंद्र आणि राज्य सरकारचे सगळे विभाग, तसंच अंमली पदार्थविरोधी कृतिदलांनी यासाठी काम करावं, असं आवाहन त्यांनी केलं. अंमली पदार्थांविरोधातली कारवाई आणि जनजागृतीची दिशा बदलण्याची गरज शहा यांनी अधोरेखित केली. देशाच्या सीमारेषांवर अंमली पदार्थ पोहोचवणारे, सीमारेषांवरून विविध राज्यांपर्यंत नेणारे आणि तिथून पानाच्या दुकानांवर किंवा तत्सम ठिकाणांपर्यंत पोहोचवणारे अशा तीन प्रकारच्या टोळ्यांवर कठोर कारवाई करायची वेळ आली असून त्यासाठी काम करणाऱ्या सगळ्यांनी ही लढाई आपली मानावी, असं ते म्हणाले.

**'सेवा पर्व'**

सार्वजनिक सेवा आणि सुशासन या मंत्रानं मार्गदर्शित, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार परिवर्तन आणि प्रगती घडवून आणण्यासाठी अथक प्रयत्न करत आहे. आज 'सेवा पर्व' या विशेष मालिकेत केंद्र सरकारच्या स्वच्छ आणि नवीकरणीय ऊर्जा विषयीच्या उपक्रमांबद्दल आपण जाणून घेऊया...

***"गेल्या दहा वर्षांत देशाच्या ऊर्जा क्षेत्रात मोठा बदल होताना दिसत आहे. जलद गतीनं क्षमता वाढवणं, सौर आणि पवन ऊर्जेत आघाडी घेणं आणि नवे उपक्रम राबवणं यामुळे भारत स्वच्छ व स्वावलंबी ऊर्जेच्या दिशेने वेगाने पुढे जात आहे.स्वच्छ ऊर्जा कार्बन उत्सर्जन कमी करण्यासोबतच हरित रोजगार निर्माण करत आहे, ऊर्जा उपलब्धता वाढवत***

*आहे आणि हवामान बदलाविरुद्धच्या लढाईत भारताची जागतिक पातळीवरील भूमिका अधिक मजबूत करत आहे. अलीकडेच गुजरातमधील हंसलपूर येथे हरित गतिशीलता उपक्रम सुरू करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की, स्वच्छ ऊर्जा आणि स्वच्छ वाहतुकीमुळे भविष्यात भारत जगाचे केंद्र बनेल."*

*(ये हमारा फ्यूचर है। ऐसे ही प्रयास से भारत तेजी के साथ क्लीन एनर्जी और क्लीन मोबिलिटी का एक रिलायबल सेंटर बनेगा।)*

*"मार्च २०१४ ते जून २०२५ या कालावधीत भारताची अक्षय ऊर्जा क्षमता जवळपास तिपटीने वाढून २२६.८ गिगावॅटवर पोहोचली आहे. सध्या अक्षय ऊर्जा आणि अणुऊर्जेसह गैर-जीवाश्म स्रोतांचा देशाच्या एकूण वीज क्षमतेत सुमारे ४९ टक्के वाटा आहे. सौरऊर्जा निर्मिती १ लाख ८ हजार गिगावॅट तासांहून अधिक झाली असून, यामुळे भारताने जपानला मागे टाकत जगातील तिसरा सर्वात मोठा सौरऊर्जा उत्पादक देश म्हणून स्थान मिळवले आहे.पीएम-कुसुम योजनेतून शेतकऱ्यांना सौर पंप दिले जात आहेत. तर पीएम सूर्यघर योजनेअंतर्गत एक कोटी कुटुंबांना छतावरील सौर पॅनेल उपलब्ध करून देत ३० गिगावॅट निवासी सौरऊर्जा क्षमतेचं उद्दिष्ट ठेवण्यात आलं आहे."*

**वस्तू आणि सेवाकर**

वस्तू आणि सेवाकर आता फक्त 5 टक्के आणि 18 टक्के अशा दोन स्तरात आकारला जाणार आहे. व्यापारी वर्गासह सामान्य जनतेनं देखील या निर्णयाचं स्वागत केलं आहे. या संदर्भात नागपुरातील एका गृहिणीचं मनोगत आपण ऐकूया -

*आज देखा गया है  हेल्थ बहुत जरूरी है और साथ में आज कितने बीमार हो रहे हैं लोग तो कहीं ना कहीं जैसे हम लोग एक कोई भी हॉस्पिटल्स में जैसे जाते हैं हमारी उम्मीद नहीं रहती है बट आप देखिए कि एक ही दिन में या घंटों में आप देखिए लाखों का कितना खर्चा हो जाता है, तो मोदी जी ने जो जीएसटी में जो कम हुआ तो मैं उनका बहुत ज्यादा आभार मानती हूँ।*

**मंत्री मंडळ निर्णय**

विदर्भातील भंडारा ते गडचिरोली दरम्यान ९४ किलोमीटरचा  प्रवेश नियंत्रित द्रुतगती महामार्ग प्रकल्प महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून उभारण्यात येणार असून या  प्रकल्पाच्या आखणीस आणि भूसंपादनास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. भूसंपादनासह अनुषंगिक ९३१ कोटी १५ लाख रुपयांच्या खर्चास देखील यावेळी मान्यता देण्यात आली. याशिवाय अकोला इथल्या दि निळकंठ सहकारी सूतगिरणीला 'खास बाब' म्हणून शासन अर्थसहाय्य मिळणार असल्याचं बैठकीत ठरविण्यात आलं.  आधुनिक संत्रा केंद्र उभारण्याच्या योजनेस २ वर्षे मुदतवाढ देण्यात आली आहे. नागपूर, काटोल, कळमेश्वर,  अमरावती जिल्ह्यातील मोर्शी आणि  बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर इथं आधुनिक संत्रा केंद्र उभारण्यात येत आहेत. मुदतवाढीसह

योजनेच्या स्वरूपात अनुषंगिक बदल करण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली. मागासवर्गीय शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या दैनंदिन निर्वाह भत्ता तसंच विद्यार्थिनींसाठीच्या स्वच्छता प्रसाधन भत्त्यात सुमारे दुपटीनं वाढ करण्यात आली आहे. याचा हजारो विद्यार्थी- विद्यार्थिनींना यामुळे दिलासा मिळणार आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजनेस पुढील दोन वर्षांसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. महाराष्ट्र ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग, कॉमिक्स आणि एक्सटेंडेड रिॲलिटी धोरण २०२५ जाहीर करण्यात आले. या अन्तर्गत सन २०५० पर्यंतचं नियोजन असून सुमारे ३ हजार २६८ कोटी रुपयांचा आराखडा प्रस्तावित करण्यात आला. राज्याच्या पायाभूत सुविधा उपसमितीला मंत्रिमंडळ समितीचा दर्जा देण्यात आला असून राज्यातील पायाभूत प्रकल्पांबाबत यापुढे उपसमिती मंत्रिमंडळ समिती म्हणून कामकाज करणार आहे.

**कोराडी सामंजस्य करार**

नागपूर महानगर क्षेत्रातील कोराडी या ठिकाणी पर्यावरणीय पर्यटन स्थळ विकसित करण्यासाठी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड यांच्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आदी उपस्थित होते. या करारानुसार पर्यटनस्थळ विकसित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड या कंपनीची सुमारे 232 हेक्टर जागा नागपूर प्रदेश विकास प्राधिकरणाला 30 वर्षाच्या भाडे करारावर प्रतिवर्ष 1/- रुपये भाडेपट्टयावर हस्तांतरित करण्यात येणार आहे. महाजेनको कंपनीनं भाडे करारानं दिलेली जागा मौजा कोराडी, महादुला, खापरखेड़ा, नांदा आणि घोगली या भागात व्यापलेली आहे. या उपक्रमाचा मुख्य आधार शाश्वत जलकेंद्रित क्रियाकलापांवर आहे.

**संयुक्त किसान मोर्चा**

संयुक्त किसान मोर्चाची शेतकरी न्याय हक्क परिषद उद्या वर्धा इथं होणार आहे. सत्यनारायण बजाज वाचनालय इथं दुपारी बारा वाजता आयोजित या परिषदेला भारतीय किसान युनियनचे नेते राकेश टिकेत, किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोक ढवळे, डॉ. अजित नवले, खासदार अमर काळे, माजी मंत्री बच्चू कडू यांच्यासह देशभरातले अनेक महत्वाचे शेतकरी नेते उपस्थित राहणार आहेत. शेतकरी कर्जमाफी, शेतीमालाचे भाव, जमीन अधिग्रहण आणि पीक विमा यासारख्या प्रश्नांना केंद्रस्थानी आणण्यासाठी संयुक्त किसान मोर्चाचा विदर्भ दौरा महत्वाचा ठरेल, असं किसान सभेचे राज्य सचिव डॉ. अजित नवले समाजमाध्यमावरील पोस्टद्वारे म्हणाले.

**स्वस्थ नारी, सशक्त परिवार**

आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयामार्फत 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' या विशेष राष्ट्रीय अभियानाला उद्यापासून सुरुवात होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते इंदूर इथं या अभियानाची सुरुवात होणार आहे. तसंच मुंबईत यशवंतराव चव्हाण सेंटर इथं या

अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ होणार आहे. या अभियानांतर्गत प्रत्येक जिल्हा आणि महापालिका स्तरावर महिला आणि बालकांसाठी विशेष आरोग्य शिबिरांचं आयोजन करण्यात आलं असून, यावेळी शासनाच्या विविध योजनांची माहिती आणि लाभ देण्यात येणार आहे. हे अभियान दोन ऑक्टोबरपर्यंत चालणार असून, सर्व महिला आणि बालकांनी या अभियानात सहभागी होण्याचं आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आलं आहे.

**विशेष रेल्वे गाड्या**

येत्या दिवाळी आणि छठ सणांमध्ये होणारी प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेता मध्य रेल्वेनं नागपूर-हडपसर (पुणे)-नागपूर दरम्यान आठवड्यातून दोन वेळा सुपरफास्ट विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार रेल्वे गाडी क्रमांक ०१२०१ नागपूर-हडपसर द्वि-साप्ताहिक सुपरफास्ट स्पेशल ही गाडी दर सोमवार आणि गुरुवारी नागपूरहून संध्याकाळी ७ वाजून ४० मिनिटांनी निघून दुसऱ्या दिवशी सकाळी ११ वाजून २५ मिनिटांनी हडपसर इथं पोचेल. येत्या २९ सप्टेंबरपासून ते २७ नोव्हेंबर दरम्यान या गाडीच्या एकूण १८ फेऱ्या होतील. ट्रेन क्रमांक ०१२०२ हडपसर-नागपूर द्वि-साप्ताहिक सुपरफास्ट स्पेशल ही गाडी दर मंगळवार आणि शुक्रवारी हडपसरहून दुपारी ३ वाजून ५० मिनिटांनी निघून दुसऱ्या दिवशी सकाळी साडे सहा वाजता नागपूर इथं पोचेल. येत्या ३० सप्टेंबरपासून ते २८नोव्हेंबर दरम्यान या गाडीच्या एकूण १८ फेऱ्या होतील. या गाड्यांना वर्धा, धामणगाव, बडनेरा, अकोला, शेगाव, मलकापूर, भुसावळ, जळगाव, मनमाड, अंकाई, कोपरगाव, बेलापूर, अहमदनगर, दौंड कॉर्ड लाईन, उरुळी, पुणे जंक्शन असे थांबे देण्यात आले आहेत. या गाड्यांसाठी तिकिटाचं आरक्षण आजपासून सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि irctc.co.in या संकेतस्थळावर सुरू झालं आहे.

**हवामान**

आज विदर्भातील अकोला, बुलढाणा आणि वाशिम जिल्ह्यात मुसळधार पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला असून नागपूर आणि अमरावतीमध्ये वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. विदर्भात इतर जिल्ह्यात हवामान सामान्य राहणार असल्याचा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागानं वर्तवला आहे. दरम्यान, नागपुरात आता थोड्या वेळेपूर्वीच मेघगर्जनेसह जोरदार स्वरुपाच्या पावसाला सुरवात झाली आहे.

*****